IO

N.C.R.B. (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** पालघर **P.S.(ठाणे):** नालासोपारा **Year (वर्ष):** 2019

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0250 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 20/07/2019 00:10 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ (संशोधन 2018) | 7 |

3. **(a) Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** शुक्रवार **Date From (दिनांक पासून):** 19/07/2019
**Time Period (कालावधी):** पहर 5 **Date To ( दिनांक पर्यंत):** 19/07/2019
**Time From (वेळेपासून):** 15:45 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 15:45 बजे

**(b) Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 19/07/2019 **Time (वेळ):** 23:50 बजे

**(c) General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**
**Entry No. (नोंद** 036 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 19/07/2019 23:54 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्तळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** पूर्व, 1.5 किमी
**Beat No. (बिट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** वसई विरार महानगरपालिका ,प्रभाग समिती ई ,तळमजला नालासोपारा पश्चिम

**(c) In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नांव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

**(a) Name (नाव):** सुरज जयदेव आंबोळकर

**(b) Father's/Husband's Name(वडील / पती का नाव)**

**(c) Date/Year of Birth (जन्म** 1991 **(d) Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

**(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):**

**(f) Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (अदा केल्याची तारीख):**

**Place of Issue (अदा केल्याची ठिकाण):**

**(g) Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

**(h) Address (पत्ता):**



Scanned by CamScanner

फिर्याद

दिनांक : १९/०७/२०१९

मी सुरज जयदेव आंबोळकर, वय–२८ वर्षे, धंदा–नोकरी, रा.राजयोग सोसायटी, सी/१०४, नालासोपारा पूर्व, ता.वसई, जि.पालघर असा असून फिर्याद लिहुन देतो की,

मी वरिल ठिकाणी माझे कुटूंबासह राहणेस असून गोरेगाव येथे डायग्नोस्टिक सेंटर येथे नोकरी करून माझे परिवाराचा उदरनिर्वाह करतो.

दिनांक २५/११/२०१८ रोजी माझा विवाह अमिता अशोक गोलतकर हिच्याशी झालेला आहे. व त्याबाबतचे विवाह नोंदणीप्रमाणपत्र काढणे आवश्यक असल्याने विवाह नोंदणी होवून प्रमाणपत्र मिळण्याबाबत मी वसई विरार महानगरपालिकेची प्रभाग समिती ई, नालासोपारा पश्चिम, ता.वसई येथील विवाह नोंदणी विभागातील लिपीक श्री.घनश्याम घुसेकर यांचेकडे दिनांक ०४/०६/२०१९ रोजी अर्ज दिला होता. त्यावेळी घुसेकर साहेबांनी मला दिनांक ०४/०७/२०१९ ही पुढील तारिख दिली होती. त्याप्रमाणे दिनांक ०४/०७/२०१९ रोजी मी घुसेकर साहेब यांना भेटलो असता त्यांनी माझ्या, माझ्या पत्नीच्या व सोबत आणलेल्या साक्षीदारांच्या विवाह नोंदणी फॉर्म वर सहया घेतल्या त्यावेळी घुसेकर साहेबांनी माझे कागदपत्र चेक केले. त्यात माझे मूळ रेशनकार्ड व शाळा सोडल्याचे दाखल्याची मूळ प्रत उपलब्ध नसल्याचे सांगून मूळ रेशनकार्ड व शाळा सोडल्याचा दाखला घेवून मला आठ दिवसांनी येण्यास सांगितले. त्याप्रमाणे दिनांक १६/०७/२०१९ रोजी मी घुसेकर साहेबांना भेटून माझे मूळ रेशनकार्ड व शाळा सोडल्याचा दाखला गावी असल्याने तो मी आणू शकत नसल्याचे सांगितले. त्यावेळी घुसेकर साहेब मला बोलले की, ''मूळ रेशनकार्ड व शाळा सोडल्याचा दाखला आणू शकत नसशील तर तुला मला १२००/–रूपये दयावे लागतील तर मी तुला विवाह नोदणी दाखला देईन.'' त्यावेळी मी त्यांना विवाह नोंदणीच्या फी बाबत विचारले असता त्यांनी मला १५० ते २०० रूपये पर्यंत फी लागेल असे सांगितले. त्यावेळी माझी खात्री झाली की, घुसेकर साहेब माझा विवाह नोंदणी दाखला बनवून देण्यासाठी माझेकडे लाचेची मागणी करित आहेत. परंतु माझी लाच देण्याची ईच्छा नसल्याने मी दुसऱ्या दिवशी म्हणजे दिनांक १७/०७/२०१९ रोजी अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, महाराष्ट्र राज्य यांचे वेबसाईटवर तक्रार नोंदविली होती व त्याच दिवशी अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, पालघर येथील पोलीस उप अधीक्षक श्री.हेगाजे साहेब यांनी मला माझे मोबाईलवर फोन करून माझे तक्रारीचे अनुषंगाने विचारणा केली होती. त्यावेळी मी त्यांना कामावर असल्याचे सांगून दिनांक १९/०७/२०१९ रोजी त्यांना भेटण्याचे सांगितले होते. त्यानुसार अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, पालघर येथील पोलीस निरीक्षक श्री.वाघमारे यांनी माझे मोबाईलवर संपर्क करून दिनांक १९/०७/२०१९ भेटण्याची वेळ व ठिकाण निश्चित केले. त्यानुसार आज दिनांक १९/०७/२०१९ रोजी नालासोपारा रेल्वे स्टेशन येथे पोलीस निरीक्षक श्री.वाघमारे यांना भेटून लोकसेवक घनश्याम घुसेकर यांचेविरूध्द लाचेच्या मागणीची तक्रार लिहून दिली.

त्यानंतर लागलीच पोनि/श्री.वाघमारे यांनी तहसिल कार्यालय, वसई येथून दोन पंच साक्षीदार मागवून घेतले व पंच साक्षीदारांसमक्ष सर्व कायदेशिर बाबींची पुर्तता करून मला डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर लावून आरोपी घनश्याम घुसेकर यांचे कार्यालयात जावून त्यांची भेट घेण्यासाठी पाठविले.

त्यानंतर मी घनश्याम घुसेकर साहेब यांचे कार्यालयात गेलो असता, घुसेकर साहेब हे त्यांच्या जागेवर हजर नव्हते. त्यावेळी मी तेथील एका कर्मचाऱ्याला घुसेकर साहेब कुठे आहेत याबाबत विचारणा केली असता त्यांनी मला घुसेकर साहेब जेवायला गेले आहेत ते दोन वाजता येतील असे सांगितले. त्यामुळे मी तेथे घुसेकर साहेब यांची वाट बघत थांबुन राहिलो. त्यानंतर थोडयावेळाने घुसेकर साहेब हे येवून त्यांचे जागेवर बसले. त्यावेळी मी त्यांचे जवळ जावून त्यांचेकडे माझ्या कामाबाबत विचारणा केली असता त्यांनी मला माझे कागदपत्रात त्रुटी असल्याचे सांगून मला माझे विवाह नोंदणी

Scanned by CamScanner

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | राजयोग सोसायटी सी/104,प्रिन्स पार्क नालासोपारा पुर्व,नालासोपारा,पालघर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | राजयोग सोसायटी सी/104,प्रिन्स पार्क नालासोपारा पुर्व,नालासोपारा,पालघर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | घनश्याम मोहन घुसेकर | | | 1. वसई विरार महानगरपालिका,प्रभाग समिती ई,तळमजला नालासोपारा पश्चिम ,नालासोपारा,पालघर,महाराष्ट्र, भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11 **Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents (प्रथम सूचना तथ्य ):**

पोलीस ठाणे नालासोपारा गु.रजि. क्र.II 250 /19 भ्रष्टाचार अधिनियम कलम 7 प्रमाणेफिर्यादीचे नाव :-श्री सुरज जयदेव आंबोळकर वय-28 वर्षे ध्ंदा- नोकरी राहणार-राजयोग सोसायटी सी/104, प्रिन्स पार्क नालासोपारा पुर्व ता.वसई ता.पालघर मोन 8879172646आरोपीत नाव :-घनश्याम मोहन घुसेकर वय-34 वर्षे व्यवसाय- लिपिक कंत्राटी वसई विरार महानगरपालिका प्रभाग समिती ई तळमजला नालासोपारा पश्चिम गु. घ. ता. वेळ व ठिकाण :-दि. 19/07/2019 रोजी 15.45 वाजता वसई विरार महानगरपालिका प्रभाग समिती ई तळमजला नालासोपारा पश्चिम हकिकत :-ता. म. वेळी व जागी यातील आरोपीत नामे घनश्याम मोहन घुसेकर यांनी फिर्यादी यांची विवाह नोंदणी प्रमाणपत्र देण्याकरिता फिर्यादीकडे 1200/- रुपये लाचेची मागणी करुन सदर लाचेची रक्कम स्विकारुन लोकसेवक या नात्याने मिळालेल्या अधिकाराचा गैरवापर करुन स्वतचा आर्थिक फायदा करुन घेतला आहे तरी आरोपीत यांच्याविरुध्द कायदेशीर फिर्याद आहे

13.**Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

(1) **Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** VASANT CHANDRAKANT LABDE(I (Inspector)) / PBMAH69388 **or**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे** **Rank (पद):**

**No.(क्र.):** **to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार**



Scanned by CamScanner

प्रमाणपत्र देण्याकरिता माझेकडे पंचासमक्ष १२००/–रूपये लाचेची मागणी केली. त्यानंतर मी नालासोपारा पूर्व–पश्चिम जोडणाऱ्या ब्रीजखाली जावून पोनि/श्री.वाघमारे यांना भेटलो त्यावेळी त्यांनी व्हॉईस रेकॉर्डर मधील ध्वनिमुद्रीत झालेले संभाषण दोन पचांसमक्ष ऐकले असता ते मी सांगितल्या प्रमाणे असल्याची खात्री करून लागलीच सापळा आजमावण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार योग्य ती कार्यवाही करून घुसेकर साहेब यांनी मागणी केलेली लाचेची रक्कम त्यांना देण्यासाठी मला पंच नं.०१ श्री.संकेत गोवारी यांचेसह वसई विरार महानगरपालिका, प्रभाग समिती ई, नालासोपारा पश्चिम, ता.वसई कार्यालयात पाठविण्यात आले.

त्याप्रमाणे मी घुसेकर साहेब यांचे वसई विरार महानगरपालिका, प्रभाग समिती ई, नालासोपारा पश्चिम येथील कार्यालयात गेलो असता त्यांनी माझेकडून मागणी केल्याप्रमाणे १२००/–रूपये लाचेची रक्कम पंचासमक्ष स्विकारली असता अॅन्टी करप्शन ब्युरो, पालघर चे पथकाने घुसेकर साहेब यांना वसई विरार महानगरपालिका, प्रभाग समिती ई, तळमजला, नालासोपारा पश्चिम, ता.वसई कार्यालयात दिनांक १९/०७/२०१९ रोजी १५.४५ वाजताचे सुमारास रंगेहात पकडले.

तरी लोकसेवक घनश्याम मोहन घुसेकर यांनी माझे विवाह नोंदणी प्रमाणपत्र देण्याकरिता माझेकडे १२००/–रूपये लाचेची मागणी करून सदर लाचेची रक्कम स्विकारून लोकसेवक या नात्याने मिळालेल्या अधिकाराचा गैरवापर करून स्वत:चा आर्थिक फायदा करून घेतला आहे. तरी माझी त्यांचेविरूध्द कायदेशिर फिर्याद आहे.

हि फिर्याद लिहून दिली.

Scanned by CamScanner

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14. **Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

ठाणे अमलदार
नालासोपारा पोलीस ठाणे

**Name** (नाम): VASANT CHANDRAKANT LABD
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): PBMAH69388



Scanned by CamScanner

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म -

**Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र):**

**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known / (संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्ट्ये, व्यंग आणि इतर तपशील))**

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म | Build (बांधा) | Height (cms.) (उंची | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा/बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)**

Scanned by CamScanner